# सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान

ई-मेल: - smkcnhm@gmail.com

रजिस्ट्रेशन नं. - महाराष्ट्र/७६०/०५/सांगली दि.१५/१२/२००५


जा. क्र. /मनपा/आरोवि/राआअ/५८६/२०२४ दि.२४/०९/२०२४

## जाहिर सुचना

विषय: - राष्ट्रीय आरोग्य अभियान कायाकल्प कार्यक्रमांतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या ठिकाणी पेस्ट कंट्रोल करण्यासाठी दरपत्रक मिळणेबाबत...

राष्ट्रीय आरोग्य अभियान कायाकल्प कार्यक्रमांतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या ठिकाणी पेस्ट कंट्रोल करण्यासाठी मान्यता प्राप्त सेवा पुरवठादरांकडून विहीत नमुन्यात खालीलप्रमाणे दरपत्रक मागवणेत येत आहेत.

| Sr. No. | Drugs Name | Unit | Rate/Unit (Inclusive of all taxes) |
|---|---|---|---|
| १ | Anti Insecticide Treatment | १ | |
| २ | Rodent Bait Station Cake | १ | |

इच्छुक सेवा व साहित्य पुरवठादरांकडून खालील अटी व शर्तीस अधिन राहून अत्यावश्यक सेवेचा पुरवठा करण्याकरिता कमीत कमी दराचे त्यासंदर्भातील आपले सिलबंद दरपत्रक दि. ०३/१०/२०२४ पर्यंत दरपत्रक मा. वैदयकिय आरोग्य अधिकारी, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका आर.सी.एच. कार्यालय, आपटा पोलिस चौकी जवळ, उत्तर शिवाजी नगर, सांगली या कार्यालयास स्वहस्ते/पोस्टाने कार्यालयीन वेळेत सकाळी १२:०० वाजेपर्यंत सादर करावे. त्यानंतर सादर करण्यात आलेल्या दरपत्रकाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच सदरची दरपत्रके त्याच दिवशी सायं. ०३:०० वाजता उघडण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

### अटी व शर्ती:

१) एका दरपत्रक धारकाने एकच दरपत्रक सादर करावे.

२) दर नमुद करताना Per Treatment and Per Rodent Bait Station Cake उत्पादित कंपनीचे नाव नमुद करणे आवश्यक राहील.

३) ईच्छुकांनी वरती नमुद केलेल्या बाबींचे दर स्वतंत्रपणे सिलबंद लिफाफा मध्ये सादर करावीत. दरपत्रक सादर करताना GST क्रमांक नमुद करावा. GST क्रमांक लागु नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक नमुद करणेत आलेल्या लेटरहेडवर दरपत्रक सादर करावे.

४) अत्यावश्यक सेवा व साहित्य सामुग्रीचे दर हे सर्व करांसहित एकत्रितरित्या (Inclusive of all taxes) नोंद करावेत.

५) **दरपत्रकामध्ये नमुद केलेले दर हे उपलब्ध बाजार भावापेक्षा जास्त नसावेत.**

६) दरपत्रक "Medical Officer of Health, Sangli Miraj Kupwad Municipal Corporation" यांचे नांवे सादर करावे व लखोटयावर नियमित लसीकरण कार्यक्रमांतर्गत अत्यावश्यक साहित्य पुरविणेकरीता असा उल्लेख असावा.

७) मंजुर दरपत्रकाप्रमाणे मागणीनुसार अत्यावश्यक अत्यावश्यक सेवा व साहित्याचा इत्यादी ७ दिवसात पुरवठा करणे बंधनकारक आहे. वेळेत पुरवठा न झालेस आपल्या संस्थेचे नाव काळया यादीमध्ये नोंदवण्यात येईल याची नोंद घ्यावी.

८) मक्तेदाराने सर्व अत्यावश्यक सेवा व साहित्य प्रा.आ.केंद्राच्या ठिकाणी पुरविणेच्या आहेत.

९) देय्यक रक्कम मंजूर दराप्रमाणे NEFT/PFMS व्दारे अदा करणेत येईल.

१०) GST दरामध्ये वाढ झाल्यास दरामध्ये वाढ करण्याबाबतचा निर्णय या कार्यालयाकडे राहिल.

११) प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

१२) दरपत्रक सादर करताना स्थानिक बाजारातील पुरवठदारांचा विचार करण्यात येईल.

१३) दरपत्रक मंजूर झालेल्या ठेकेदाराने अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास येताच पुर्व सुचनेशिवाय दरकरार रदद करण्यात येईल आणि मंजूर पुरवठाधारकाचे नाव काळया यादीत घालणेत येईल.

१४) काही तांत्रिक अडचणीमुळे दरपत्रक नाकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता दरपत्रक प्रक्रिया रदद करणेचा अधिकार मा. वैदयकीय आरोग्य अधिकारी सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे. त्यासाठी कोणतेही तोंडी कारण दिले जाणार नाही अगर पत्रव्यवहार केला जाणार नाही.

तसेच दरपत्रक सादर करु इच्छिणाऱ्यांनी http://www.arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट दयावी.

(डॉ. वैभव पाटील)
**वैदयकीय आरोग्य अधिकारी**
सांगली, मिरज आणि कुपवाड
महानगरपालिका